# ऑनलाईन अर्जासाठी महत्वाच्या सूचना.

**सदरची पुरूष व महिला प्रतीक्षाधीन यादी महाराष्ट्रातल्या कोणत्याही जिल्ह्यात कर्तव्य करण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांसाठी तयार करण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे आस्थापनेवरील पुरूष व महिला सुरक्षा रक्षक [कंत्राटी] प्रतीक्षाधीन यादी – सप्टेंबर २०१८ साठी अर्ज भरायला सुरूवात करण्यापूर्वी व अर्ज भरताना होणारा संभाव्य गोंधळ टाळण्यासाठी आवश्यक असणारी सर्व माहिती, कागदपत्रे/प्रमाणपत्रे [सूचीप्रमाणे] हाताशी तयार असल्याची खातरजमा करून घ्या.

1. सूची [Check List] :

| | | |
|---|---|---|
| भ्रमणध्वणी क्रमांक | नियमीत सूचना प्राप्त करण्यासाठी वैध भ्रमणध्वणी क्रमांक अर्जातील 09 नंबरच्या मुद्द्यापुढे लिहिणे **अनिवार्य** आहे. आपल्या भ्रमणध्वणी क्रमांकावर एसएमएस द्वारे नियमित सूचना पाठविल्या जातील. | ✓ |
| आधार क्रमांक | उमेदवारांनी अर्ज भरताना स्वत:चे आधार कार्ड क्रमांक अचूक नमुद करणे **अनिवार्य** आहे. | ✓ |
| PAN कार्ड क्रमांक | PAN क्रमांक काढला असल्यास नमूद करावा.<br>[PAN कार्ड नसल्यास PAN कार्डसाठी Apply करा. तसेच शारीरिक चाचणीला येण्यापूर्वी PAN कार्डसाठी अर्ज करून PAN मिळवावा] | ✓ |
| दस्तऐवज | इयत्ता बारावी उत्तीर्ण गुणपत्रिका, अधिवास प्रमाणपत्र [महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचे] इत्यादी प्रमाणपत्रे अर्ज भरताना सोबत ठेवावीत ज्या योगे अचूक माहिती भरता येईल. | ✓ |
| प्रवेश शुल्क | **Rs. ३००/- ( Non Refundable) (Online पद्धतीने NEFT द्वारेच भरावे)** | ✓ |

- अर्जावरील * ची खूण अनिवार्यता दर्शविते.
- वयोमर्यादा निश्चितीकरिता दिनांक (Cut Off Date) :- १८ ते २८ वर्षे [३१/०९/१९९० ते ३१/०९/२००० दरम्यान जन्मलेले उमेदवारच पात्र ठरतात. वयात पात्र नसलेल्या उमेदवारांचा Online अर्ज स्वीकारलाच जाणार नाही. [दिनांक २९/०९/१९९० व ०१/१०/२००० रोजी जन्मलेले उमेदवार पात्र ठरणार नाहीत]
- अशा उमेदवारांनी अर्ज केल्यास त्यांचा अर्ज नामंजूर केला जाईल याची नोंद घ्यावी.

१.१. **शैक्षणिक पात्रता :-** बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. [First Attempt चे - Weightage] [सविस्तर माहितीसाठी जाहिरात पहावी]

१.२. **अर्ज करण्याची पध्दत :-**

- आवेदन अर्ज [Application Form] :- प्रतीक्षाधीन यादीसाठी आवेदन अर्ज महामंडळाचे **www.mahasecurity.gov.in** या संकेतस्थळाद्वारे ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील. संपर्क तपशीलामध्ये संपूर्ण पत्ता अचूक भरावा. शैक्षणिक तपशीला मध्ये गुणपत्रिकेनुसार माहिती भरावी.
- **आवेदन अर्ज कोठल्याही Internet Connection असलेल्या संगणकावरून अथवा 3G / 4G / Wi-Fi Connection असलेल्या मोबाईल फोन वरून भरता येईल.**

१.३. सुरक्षा रक्षक प्रतीक्षाधीन यादीच्या अटी व शर्ती महामंडळाचे [www.mahasecurity.gov.in](http://www.mahasecurity.gov.in) या संकेतस्थळावर **Recruitment** या **tab** मध्ये पहाव्यात.

1. **Online** अर्ज भरण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या HDFC बँकमधील खालील नमूद खात्यामध्ये प्रक्रिया शुल्क रु. ३००/- केवळ NEFT द्वारेच भरावेत. प्रक्रिया शुल्क भरणा केल्यानंतर बँकेमार्फत आपणास UTR/Reference नंबर प्राप्त होईल.
   - १.१. HDFC वगळता अन्य बँकेच्या कोठल्याही ब्रांचमध्ये शुल्क जमा केल्यास त्याचा UTR नमूद करावा. HDFC ते HDFC बँकेच्या शाखेत शुल्क अदा केल्यास UTR ऐवजी Reference नंबर मिळेल तो लिहावा. अर्जदारांनी **अन्य बँकांच्या शाखेद्वारे / App द्वारे केवळ NEFT द्वारेच शुल्क अदा करावे**.
   - १.२. प्रत्येक उमेदवाराने त्यांचा बँकेकडून प्राप्त झालेला UTR/Referance नंबर अचूक नमूद करावा. तसेच प्राप्त UTR/Reference नंबर कोणासही देऊ नये.
   - १.३. एकाच UTR/Reference नंबरवर एकापेक्षा जास्त अर्ज असल्यास सदर उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.
2. Bank Details :- HDFC BANK LTD., HDFC CURRENT A/c No. **50200029300297,** BRANCH- CHURCHGATE INDUSTRY HOUSE, CHURCHGATE MUMBAI, IFSC Code – HDF**C0000501** MAHARASHTR STATE SECURITY CORPORATION च्या नावाने NEFT करावे.
3. Online अर्ज भरताना प्राप्त झालेला UTR/Reference नंबर अचूक भरावा अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
4. UTR/Reference नंबर नमुना खालीलप्रमाणे टाकावा.

**उदा.**

| **UTR नंबर नमुना** | **Reference नंबर नमुना** |
|---|---|
| **UBINR52018048300129111** | **FT805222046983** |

5. Online अर्ज भरल्यानंतर Submit बटनावर Click करावे.
6. उमेदवारांनी अर्ज भरताना जो E-mail ID दिला आहे. त्यावर उत्तरादाखल आलेल्या फॉर्मची एक प्रत मैदानी चाचणीकरिता येताना सोबत घेऊन यावी. [फॉर्म Submit झाल्यावर आपल्या E-mail अकाऊंट चे Inbox अथवा Spam फोल्डर पहावे.]

**२. मैदाणी चाचणी प्रक्रिया :-** ऑनलाईन आवेदन अर्ज भरल्यानंतर उमेदवारांना मैदानी चाचणी करीता अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर संदेश पाठविण्यात येईल. या संदशामध्ये मैदानी चाचणी करीता हजर राहण्याची तारीख, वेळ व ठिकाण इत्यादी गोष्टीचा समावेश असेल. **उमेदवारांनी मैदानी चाचणी करीता येताना ऑनलाईन अर्ज भरल्या बाबतची प्रिंट आऊट तसेच UTR/Reference नंबरची पावती घेऊन यावी. अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.**

- **मैदानी चाचणी गुण प्रक्रिया :-**

➢ **पुरूष उमेदवार [१६०० मीटर धावणे] :-**

(१) ५ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी – ५० गुण
(२) ५ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मि. ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी – ४० गुण
(३) ५ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी – २० गुण
(४) ५ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी – १० गुण
(५) ६ मि. १० सेकंदापेक्षा जास्त - **अपात्र - ०० गुण**

➢ **महिला उमेदवार [८०० मीटर धावणे] :-**

(१) २ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - ५० गुण.
(२) २ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. ०० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - ३५ गुण.
(३) ३ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - १५ गुण.
(४) ३ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. २० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी - ०५ गुण.
(५) ३ मि. २० सेकंदापेक्षा जास्त – **अपात्र - ०० गुण**

३. **प्रमाणपत्रांची निश्चिती दिनांक [Cut off Date] :-** अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांक ३०/०९/२०१८ रोजीपर्यंत सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे व अर्हता प्राप्त करून घेणे उमेदवारांवर बंधनकारक राहिल. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांका नंतर प्राप्त करून घेण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाही.

४. **प्रतीक्षाधीन यादी :-** उमेदवारांचे मैदानी चाचणी व बारावी परिक्षेतील प्राप्त गुण एकत्रित करून प्रतीक्षाधीन यादी तयार करण्यात येईल. सदरबाबतची प्रतीक्षाधीन यादी **www.mahasecurity.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

४.१ मैदानी चाचणी व शैक्षणिक गुणानुसार **तात्पुरती प्रतीक्षाधीन यादी** तयार करण्यात येईल.
४.२. **प्रतीक्षाधीन यादीतील उमेदवारांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असेल.**
४.३. जाहिरातीतील नमूद पदांची संख्या महामंडळाच्या आदेशाच्या अधीन असेल.
४.४. **प्रतीक्षाधीन यादीत चयन होणे म्हणजे Appointment नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**
४.५. प्रतीक्षाधीन यादीतील उमेदवारांना महामंडळाच्या आवश्यकतेनुसार पाचारण करण्यात येईल.

- **महत्वाची सूचना [Training] :-**

(१) प्रशिक्षणासाठी हजर राहण्याबाबतचा संदेश प्राप्त झाल्यानंतर उमेदवारास प्रशिक्षण फी रु. ७५००/- (Refundable Subject to Condition) रोखीने भरणे आवश्यक आहे.
(२) प्रशिक्षण फी न-भरल्यास प्रवेश दिला जाणार नाही.
(३) प्रशिक्षणासाठी हजर राहिल्यानंतर प्रशिक्षण अर्धवट सोडून गेल्यास प्रशिक्षण फी परत दिली जाणार नाही.
(४) **प्रशिक्षणास हजर राहताना उमेदवारांना (पुरूष/महिला) वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असल्याचे MBBS डॉक्टरचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल, त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.**

- महामंडळाची भरती प्रक्रिया पूर्णपणे संगणकीकृत आहे आणि निवड केवळ उमेदवारांच्या गुणवत्तेवर आधारीत आहे.
- महामंडळाचे अधिकृत संकेतस्थळ आणि वृत्तपत्रे मधील जाहिरातींवरच विश्वास ठेवा.

- महामंडळामध्ये नोकरी मिळविण्याच्या खोट्या आश्वासानानी प्रभाव, पैसा अथवा इतर कोणत्याही अनुचित मार्गाने फसवणूक करण्याऱ्या दलाल आणि जॉब रॅकेटर्स पासून सावध रहा.
- लाच देणे अथवा घेणे गुन्हा आहे.
- अनुचित प्रकारांमध्ये समावेश असलेल्या उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल आणि त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
- **केवळ गुणवत्तेमुळे तुम्हाला महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळात नोकरी मिळू शकते.**
- जर कोणी आपल्याला महामंडळामध्ये नोकरी मिळवून देण्याचा दावा करत असेल आणि पैसे मागत असेल तर जवळच्या पोलीस ठाण्यात अथवा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, येथे तक्रार दाखल करावी. तसेच महामंडळाचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

******